International Journal of Leading Research Publication (IJLRP)

E-ISSN: 2582-8010 ● Website: www.ijlrp.com ● Email: editor@ijlrp.com

# यशवंतराव चव्हाण यांची भाषिक राज्यनिर्मितीबाबतची भूमिका

## प्रा.विजय रामराव पांडे

सहायक प्राध्यापक व विभागप्रमुख
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय
फुलंब्री जि. औरंगाबाद

महाराष्ट्रातील शैक्षणिक व सामाजिक परिवर्तनाच्या महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेला प्रगल्भित करण्याचे काम पुढे यशवंतराव चव्हाण यांनी केले आहे. एक प्रगल्भ राजकारणी, उत्कृष्ठ साहित्यिक, सह्याद्रीचा पुरोगामी व प्रतिभासंपन्न नेता, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून यशवंतराव चव्हाण यांना ओळखले जाते. भारताच्या स्वातंत्र्यानंतर प्रांतीय पुनर्रचना हा भारताच्या राष्ट्रीय राजकारणातील एक महत्त्वपूर्ण प्रश्न होता. भाषिक आधारावर राज्यांची निर्मिती करण्याचा आग्रह १९४७ पूर्वीपासूनच वाढत होता. याच प्रक्रियेत महाराष्ट्र राज्य निर्मितीचा लढा आकाराला आला. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे या चळवळीतील संतुलित, संयमी आणि विधायक भूमिकेमुळे विशेष ओळखले जातात. त्यांची भाषिक राज्यनिर्मितीबाबतची भूमिका महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या इतिहासात एक महत्त्वाचा अध्याय आहे.

ग्रामीण भागात उदयास आलेले आर्थिक संपन्न नसलेले नेतृत्व पुढे राष्ट्रीय राजकारणात सक्रीय व यशस्वी योगदान देते ही महाराष्ट्राच्या दृष्टीने अतिशय गौरवाची बाब होती. महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रातील योगदामध्ये यशवंतराव चव्हाणांनी मुंबई राज्याच्या मंत्रिमंडळात गृहखात्याचे सचिव, नागरी पुरवठा मंत्री, द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री आणि स्वतंत्र महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री या पदावर आपले योगदान दिलेले आहे. आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण लोकशाही मूल्यांवर आणि समाजवादी समाजरचनेवर झाली पाहिजे हे त्यांच्या कार्याचे मुख्य सुत्र होते, द्वैभाषिक मुंबई राज्य व पुढे महाराष्ट्र राज्याची निर्मिती या अनुषंगाने यशवंतराव चव्हाणांची भाषिक राज्याबाबतची भूमिका सदरील शोधनिबंधात अभ्यासण्याचे योजिले आहे. सदरील शोधनिबंधासाठी कृष्णाकाठ, ऋणानुबंध, भूमिका या यशवंतराव चव्हाण लिखित साधनांचा व काही दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्रात भारताच्या स्वातंत्र्यापूर्वीच म्हणजेच 1946 सालापासूनच संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे आंदोलन आकारास येऊ लागले. या आंदोलनाचा प्रथम पुढाकार महाराष्ट्राच्या साहित्यकारांनी केला. त्यानंतर लगेच

महाराष्ट्राच्या राजकीय पक्षांनी त्या आंदोलनाला पाठिंबा दिला व ते आंदोलन सबंध महाराष्ट्रभर पसरले. महाराष्ट्राचा काँग्रेस पक्ष त्यापासून अलिप्त राहू शकला नाही. महाराष्ट्र काँग्रेस समितीने या मागणीचा ठराव एकमताने संमत केला. यशवंतराव चव्हाण या आंदोलनात हिरीरीने सहभाग घेतला नसला, तरी त्याला त्यांचा मनापासून पाठिंबा होता, यशवंतरावांच्या लक्षात आले होते, की काँग्रेसला संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे नेतृत्व करता येणार नाही, त्याकरिता आपणास काँग्रेसमधून फुटून निघावे लागेल. त्यामुळे महाराष्ट्राच्या काँग्रेसमध्ये फूट पडली व ती वाढत गेली.[1] कारभार करणे व निवडणुका लढविणे हेच केवळ राजकारण नसून ते एक समाज परिवर्तनाचे साधन आहे, हा सिद्धांत देशातील महान नेत्यांनी आपल्यासमोर ठेवला आहे ही त्यांची विचारधारा होते.. सामाजिक सुधारणा वादाला समतेच्या दृष्टीने ज्या गोष्टी अपेक्षित होत्या व आहेत त्यांचा समावेश हा राजकारणात असला पाहिजे. समाज क्रांती हेच आपल्या राजकारणाचे आणि पर्यायाने सामाजिक व सार्वजनिक जीवनाचे उद्दिष्ट असले पाहिजे[2] अशी राजकारणाविषयीची यशवंतरावांची धारणा होते. 18 नोव्हेंबर 1955 यावर्षी संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे पर्व सुरू झाले होते. या दिवशी हिंसाचाराचा उद्रेक होऊन पोलिसांनी लोकांवर दडपशाही सुरू केली होती. 1955 मध्ये सर्वसामान्य महाराष्ट्र चळवळ तीव्र झाली तेव्हा, चव्हाण यांनी हिंसात्मक मार्गाऐवजी राजकीय व संवैधानिक मार्गाने मागणी मांडण्याचा आग्रह धरला. 20 नोव्हेंबर 1955 ला जाहीर सभेत मोरारजी देसाई व स. का. पाटील यांच्यावर लोकांनी दगडांचा व चपलांचा मारा केला तेव्हा यशवंतराव चव्हाण असे म्हणाले होते की नेहरू आणि संयुक्त महाराष्ट्र यांच्यात मला निवड करण्यास सांगितले तर मी पंडित नेहरूंची निवड करीन. या त्यांच्या विधानामुळे त्यांच्यावर विरोधी पक्षाने मोठ्या प्रमाणात टीका केली. यशवंतरावांना या ठिकाणी जो अर्थ अपेक्षित होता तो म्हणजे नेहरू केवळ व्यक्ती म्हणून नव्हे तर ते भारताचे पंतप्रधान होते आणि भारताचे हित म्हणजे राष्ट्रहित सर्वप्रथम या अर्थाने त्यांनी मी पंडित नेहरूंची निवड करीन असे विधान केले होते म्हणजेच मी राष्ट्राची प्रथम निवड करेल असे त्यांना म्हणायचे होते. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाबाबत यशवंतरावांच्या भूमिकेबद्दल लोकांच्या मनात संशय होता. परंतु महाराष्ट्र निर्मिती बद्दल यशवंतरावांची भूमिका किती विकासाभिमुख होते हे त्यांच्या एका वक्तव्यावरून स्पष्ट होते. ते म्हणतात "राष्ट्रीय प्रवाह पासून महाराष्ट्र वेगळा राहिला तर आपल्या राज्याची प्रगती खुंटेन.[3] त्यांची भूमिका संतुलित होती. एका बाजूला संयुक्त महाराष्ट्रचा आग्रह, तर दुसऱ्या बाजूला मुंबई ही सर्व भारतीयांची आहे हे अधोरेखित करणारा त्यांचा दृष्टिकोनअसलेला दिसतो.

"महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू व एम एन रॉय यांचा यशवंतराव वर प्रभाव असल्याने त्यांचे मूल्यादिष्टित राजकारण व भावनेपेक्षाही वैचारिकतेला महत्त्व देणारे राजकारण या ठिकाणी महत्वाचे होते. महात्मा गांधींचा त्यांच्यावर प्रभाव असला तरीही कृष्णाकाठ मध्ये ते म्हणतात, आम्ही सर्वच कार्यकर्त्यांनी गांधींचे राजकीय नेतृत्व मान्य केलेले होते: परंतु सर्वांनीच त्यांचे तत्वज्ञान स्वीकारले होते किंवा सर्वांना ते समजलेले होते असे म्हणता येण्यासारखे नव्हते.[4] 16 जानेवारी 1956 रोजी पंतप्रधान म्हणून पंडित नेहरूंनी मुंबई केंद्रशासित प्रदेश म्हणून निर्णय जाहीर केला. या नेहरूंच्या निर्णयामुळे मुंबईमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी दंगली होऊन 105 जण मरण पावले. परंतु यशवंतराव चव्हाण व इतर काही मंत्रिमंडळातील मराठी भाषिक

सदस्यांनी एकदाही निषेध केला नाही. केवळ केंद्रीय वित्तमंत्री चिंतामणराव देशमुख यांनी या प्रश्नावर राजीनामा दिला. त्यामुळे संसदेने द्विभाषिक मुंबई राज्याची कल्पना उचलून धरली.

1 नोव्हेंबर 1956 ला द्विभाषिक मुंबई राज्य निर्माण झाले. हे मुंबई राज्य म्हणजे कच्छ, राजकोट सह गुजरात, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकण असा होता. कर्नाटकाचा भाग त्यातून वगळला होता. भाषा, शिक्षण, विकास, आणि विचार याबाबतीमध्ये यात कोणतेही समानता नव्हती. द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी सत्ता हाती घेतली. त्यांनी केंद्रीय नेतृत्वाला असे आश्वासन दिले होते की हे द्विभाषिक राज्य प्रामाणिकपणे राबवले जाईल. आणि त्याच वेळेला जनतेला त्यांनी असे आश्वासन दिले होते की, संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन दडपण्यासाठी मी राज्याची सूत्रे हाती घेतली नाहीत.[5] पुढे इसवी सन 1957 मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या अनावरण समारंभ प्रसंगी प्रतापगडावर रस्त्यांवर संयुक्त महाराष्ट्र राहण्यासाठी आंदोलनकर्त्यांनी, मराठी माणसांनी मोर्चे काढले. तेव्हा पंडित नेहरू च्या हे लक्षात आले होते की आम्ही जरी द्विभाषिक राज्य ही संकल्पना राबवित आहोत, तरीही लोकांच्या मनामध्ये ही संकल्पना उतरत नाहीये. विकासाची कामे करणे हे सरकारचे कर्तव्यच आहे व सरकार ते करीत राहील पण यासाठी द्विभाषिक राज्याची गरज नाही अशी लोकांची भावना आहे व म्हणून ते संतुष्ट नाहीत.[6] अशा प्रकारची भूमिका यशवंतराव चव्हाण यांनी यावेळी पंडित नेहरू समोर मांडली. शासकीय दृष्ट्या द्विभाषिक मुंबई राज्य चांगल्या प्रकारे चालू आहे, पण राजकीय दृष्ट्या त्या पद्धतीने ते चाललेले नाही अशा प्रकारची मानसिक भूमिका पंडित नेहरूंची यावेळी झाली. महाराष्ट्राने दिल्लीशी, दिल्लीच्या नेतृत्वाची जमवून घेतले पाहिजे ही यशवंतरावांची राजकीय नीती होती. त्या त्या राज्याने देशाच्या राजकीय प्रवाह सोबत असायला पाहिजे. राष्ट्रीय प्रवाहापासून आपण दूर जाता कामा नये अशी त्यांची भूमिका होती. नवी दिल्लीतील नेतृत्वाला महाराष्ट्राबद्दल विश्वास निर्माण करून देण्याचे आणि प्रसंगी त्यांचे मतपरिवर्तन करण्याचे काम यशवंतरावांनी केले.[7] भाषिक राज्य निर्मितीच्या काळात आंदोलकांमध्ये तीव्र भावना असतानाही चव्हाण यांनी संवाद, तडजोड, लोकशाही व संवैधानिक मूल्यांचा आग्रह धरला. फलटणच्या ऐतिहासिक भाषणात, यशवंतराव चव्हाण म्हणतात, देशापेक्षा मला नेहरू मोठे वाटतात. महाराष्ट्रात यशवंतरावांची या भूमिकेमुळे अनेकांनी निर्भत्सना केलेली दिसते. एवढेच नव्हे तर त्यांचा उल्लेख सूर्याजी पिसाळ असा सुद्धा करण्यात येऊ लागला. आचार्य अत्रे यांनी तर चव्हाण या नावातील च काढून टाकला तर शेवटी वाहन फक्त शिल्लक राहते असे उद्गार काढले होते.[8] शेवटी मुख्यमंत्री म्हणून या द्विभाषिक राज्याचा कारभार मी यापुढे चालू शकणार नाही[9] या यशवंतरावांच्या भूमिकेचा पंडित नेहरूंना विचार करावा लागला आणि 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. आणि या नवनिर्मित महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा मान हा यशवंतराव चव्हाण यांना प्राप्त झाला. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली, त्यात त्यांच्या संयमी नेतृत्वाचा मोलाचा वाटा होता.

**सारांश:**

भाषिक राज्य निर्मिती ही भारताच्या संघराज्यात्मक रचनेत एक ऐतिहासिक घटना होती. महाराष्ट्र राज्य निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांची भूमिका ही राष्ट्रीयता, लोकशाही आणि समावेशकता यांची सांगड घालणारी

होती. त्यांनी भाषिक राज्यांचा पुरस्कार केला, परंतु तो नेहमी राष्ट्रीय एकात्मतेच्या चौकटीत ठेवला. म्हणूनच त्यांचे नेतृत्व आजही प्रगल्भ व आदर्श मानले जाते. भाषिक राज्याबाबत यशवंतराव चव्हाण यांची भूमिका राष्ट्र प्रथम आणि नंतर राज्य अशा प्रकारची राहिलेली होती. . लोक आग्रह म्हणून महाराष्ट्र राज्याची निर्मिती झालीच पाहिजे परंतु त्यामुळे राष्ट्रहितास कोणतीही बाधा पोहोचणार नाही यासंदर्भातील काळजीही घेतली गेली पाहिजे याबाबत त्यांचा आग्रह होता. सत्तेचा प्रमुख म्हणून या विषयावर त्यांना संयमाने घ्यावे लागले. प्रसंगी विरोधकांची ती काही त्यांना सहन करावी लागली. परंतु ही त्यांची भूमिका महाराष्ट्र विरोधी किंवा महाराष्ट्र विसंगत अशा स्वरूपाची नक्कीच नव्हती. तत्कालीन राजकीय परिस्थितीला अनुसरून त्यांनी भूमिका घेतलेली होती आणि त्यातून पुढे महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली असे म्हणावे लागेल.

**संदर्भ:**

1. कायदे पाटील गंगाधर वि., यशवंतराव चव्हाण, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक, प्रथम आवृत्ती, डिसेंबर 2006, पृ. 52.
2. चव्हाण यशवंतराव, सह्याद्रीचे वारे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
3. पाटील वसंतदादा, यशवंतराव चव्हाण: लोकशाही समाजवादावर श्रद्धा असलेला नेता, विशेषांक, महाराष्ट्र संचार, 1966, पृ. 4
4. चव्हाण यशवंतराव, कृष्णाकाठ, रोहन प्रकाशन, मुंबई, पुनरमुद्रण, फेब्रुवारी 2013, पृ. 121.
5. कायदे पाटील गंगाधर वि., उपरोक्त, पृ. 52.
6. चव्हाण यशवंतराव, ऋणानुबंध, रोहन प्रकाशन, मुंबई, पुनरमुद्रण, फेब्रुवारी 2013, पृ. 88.
7. कायदे पाटील गंगाधर वि., उपरोक्त, पृ. 54.
8. कायदे पाटील गंगाधर वि., उपरोक्त, पृ. 54.
9. गाडे सोपान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, अविष्कार प्रकाशन, पुणे, 2002, पृ. 18.
10. दांडेकर आर. आर. महाराष्ट्र राज्याची निर्मिती: एक ऐतिहासिक अभ्यास. पद्मगंधा प्रकाशन, पुणे, 1998.
11. कुलकर्णी वि. स. यशवंतराव चव्हाण: एक अभ्यास. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, मुंबई, 1996.
12. राज्य पुनर्रचना आयोग अहवाल (फजल अली आयोग). भारत सरकार, 1955.
13. चव्हाण, वसंत. महाराष्ट्र राज्य निर्मिती चळवळ. मुंबई: डायमंड पब्लिकेशन्स, मुंबई, 2005.
14. Kulkarni, A.R., Maharashtra in the 20th Century, Diamond Publications, Pune 2007.
15. Nanda, B.R., History of Modern India, Orient Blackswan, New Delhi, 2010.